# विद्यापीठात प्रश्नसंच तयार करण्यास सुरुवात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा लेखी परीक्षा १ ऑक्टोबरपासून घेण्यात येणार आहेत. या परीक्षांसाठी अधिकार मंडळांच्या सूचनेनुसार परीक्षेला लागणाऱ्या प्रश्न संच तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.



विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून तयारी सुरू आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या २२० हून अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७५ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

मार्चपर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर आधारीत परीक्षा घेण्यात येणार आहे. अधिकार मंडळांच्या सूचनेनुसार परीक्षेला लागणाऱ्या प्रश्न संच तयार करण्याचे काम सुरू आहे. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने परीक्षा घेण्याची पूर्ण तयारी केली आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिलेल्या वेळेत परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी तयारीला लागण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

**मोबाईल नंबर, इमेल आयडी अपडेट करणे गरजेचे**

कोरोनामुळे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांचा सध्या सुरू असणारा मोबाईल नंबर आणि इमेल आयडी असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले मोबाईल नंबर बदलले असल्यास सध्या सुरू असणारे मोबाईल नंबर आणि इमेल आयडी महाविद्यालयात देण्याचे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# शिवाजी विद्यापीठाला घ्यावी लागणार २२ दिवसांत परीक्षा

## शासनाचे निर्देश : परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून तयारी सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाला विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा २२ दिवसांत घेण्याची प्रक्रिया करावी लागणार आहे. त्या दृष्टीने विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून तयारी सुरु झाली आहे. दि. १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा होणार आहेत.

या परीक्षा दरवर्षी ६० दिवसांमध्ये घेतल्या जातात; पण कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील सद्य:स्थितीत या परीक्षा २२ दिवसांमध्ये घ्याव्या लागणार आहेत. त्यांची तयारी परीक्षा मंडळाकडून मंगळवारपासून सुरु करण्यात आली आहे. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका बनविण्याची सूचना प्राध्यापकांना करण्यात आली आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असणारी संगणकप्रणाली मिळविण्याची प्रक्रिया विद्यापीठ प्रशासनाने सुरु केली आहे.

अंतिम सत्राची परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे ई-मेल आणि मोबाईल क्रमांक संकलित करण्याबाबतची सूचना महाविद्यालयांना करण्यात आली आहे. परीक्षा घेताना कोणती दक्षता बाळगली पाहिजे याबाबतच्या मार्गदर्शक सूचना शासनाकडून विद्यापीठ प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी मंगळवारी दिली.

### दोन समित्यांची नियुक्ती

या परीक्षांचे प्रश्नसंच बनविण्यासाठी चार अधिष्ठातांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय समिती आणि संगणकप्रणाली मिळविण्यासाठी तांत्रिक समितीची नियुक्ती करण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

### परीक्षा मंडळासमोरील आव्हाने

परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे ७० कर्मचारी असून, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन निर्देशानुसार सध्या रोज ४० कर्मचारी उपस्थित राहतात. या मंडळातील ४७ पदे रिक्त आहेत. अतिरिक्त मनुष्यबळ मिळेपर्यंत उपलब्ध कर्मचाऱ्यांमध्ये परीक्षा घेण्याचे आव्हान या मंडळाला पेलावे लागणार आहे.